निविदा/कोटेशन

जा क्र. /म.सं.के./ता./भा.दर / 718 /२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला
दि. 16/09/2022

प्रति,

----------------------------------
----------------------------------
----------------------------------

विषय :- सन २०२२ - २०२३ करिता भाडे तत्वावरील खाजगी कंम्बाईन हारवेस्टरने कापणी/मळणीचे प्रति हेक्टर दर कळविणे बाबत.

महोदय ,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्रावर खरीप व रब्बी हंगाम सन २०२२-२०२३ मधील विविध पिकाची कापणी व मळणी करण्या करिता इच्छुक कंम्बाईन हारवेस्टर /थ्रेशर धारका कडुन कापणी/मळणीचे प्रति हेक्टर व प्रति क्विंटल दर खालील तक्त्यानुसार मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पिकाचे नांव | कंम्बाईन हारवेस्टरने कापणी व मळणी प्रति हेक्टरी दर रुपये | थ्रेशर मळणी यंत्राव्दारे प्रति क्विंटल दर रुपये |
|---|---|---|---|
| १ | सोयाबिन | | |
| २ | तुर | | |
| ३ | ढेंचा | | |
| ४ | बोरू | | |
| ५ | करडी | | |
| ६ | हरबरा | | |
| ७ | गहु | | |

सदर कामे करण्याकरिता सविस्तर अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत. दर सादर करतेवेळी पाकीटावर मालकाचं नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इ. चा स्पष्ट उल्लेख केलेला असावा. तरी इच्छुक मालकांनी उपरोक्त प्रमाणे दर तक्त्याच्या रुपात या कार्यालयाला दि. २७.०९.२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेपर्यत बंद लिफाफ्यामध्ये स्पष्ट, सुटसुटित अक्षरात सादर करावेत. आवश्यक सर्व अटी पुर्ण करणा-या मालकाचाच विचार करण्यात येईल याची कृपाय नोंद घ्यावी.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला

**टिप - ( Class Combine Harvester ) ला प्रथम प्राधान्य देण्यात येईल.**

अटी व शर्ती

१. विभागावर काम करतांना काम समाधानकारक झाल्याची खात्री झाल्यानंतरच देयक काढण्यात येईल.
२. कंम्बाईन हारवेस्टर व थ्रेशर चांगल्या स्थितीत असावेत.
३. कंम्बाईन हारवेस्टरची व थ्रेशरची सर्व कामे ही कार्यालयीन वेळेतच करून घेण्यात येईल.
४. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.
५. विभागावर देण्यात आलेले काम पुर्ण करावे लागेल, अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
६. कंम्बाईन हारवेस्टरची व थ्रेशरची कामे करतांना मशिन बिघडल्यास त्याची सर्व जबाबदारी मालकाची राहील.
७. कंम्बाईन हारवेस्टरची व थ्रेशरची कामे करतांना दुर्घटना किंवा जिवीत हानी झाल्यास त्याची सर्व जबाबदारी मालकाची राहील.
८. कंम्बाईन हारवेस्टरची व थ्रेशरची कामे करण्या करिता कोणताही मजुर व इंधन या कार्यालयातर्फे पुरविण्यात येणार नाही.